साहिल लहू कोळी, वरेडी.

□ **लता मंगेशकरनी कोणकोणत्या चित्रपटात भूमिका केलीय?**

– *पहिली मंगळागौर, चिमुकला संसार, माझं बाळ, गजाभाऊ* या मराठी, *छत्रपती शिवाजी* या हिंदी-मराठी व *बडी माँ, सुभद्रा, जीवनयात्रा, मंदिर* या हिंदी चित्रपटात. अलीकडेच *पुकार* या चित्रपटातील एका गाण्यात त्या पडद्यावर दिसल्या आहेत.

सुमन लहू कोळी, वरेडी.

□ **उषा चव्हाणचा पहिला चित्रपट कोणता? दादा कोंडकेच्या बरोबरचे चित्रपट कोणकोणते?**

– उषा चव्हाणचा पहिला चित्रपट केला इशारा जाता जाता. दादा कोंडकेच्या बरोबरचे तिचे चित्रपट *सोंगाड्या, एकटा जीव सदाशिव, पांडू हवालदार, राम राम गंगाराम, बोट लावीन तिथं गुदगुदल्या, गनिमी कावा, आली अंगावर, मुका घ्या मुका, पळवापळवी, वाजवू का?, अंधेरी रात में दिया तेरे हात में.*

सोनाली पंडित, भायखला.

□ **राजेश खन्ना व डिंपल यांनी कोणकोणत्या चित्रपटात एकत्र भूमिका केलीय?**

– *जय जय शिवशंकर* या एकाच चित्रपटात. पण हा चित्रपट पूर्ण होऊनदेखील अद्यापि पडद्यावर आलेला नाही.

दत्तू कोळी, वरेडी, कोळीवाडा.

□ **अनिल कपूर व माधुरीने एकत्र भूमिका केलेला पहिला चित्रपट कोणता?**

– *हिफाजत.*

राहुल काळे , डोबिंवली.

□ **सुनिल शेट्टी व अक्षयकुमार यांचा पहिला चित्रपट कोणता?**

– सुनिल शेट्टीचा पहिला चित्रपट *बलवान*, अक्षयकुमारचा पहिला चित्रपट *खिलाडी*.

कृष्णा अबाजी कोळी, वरेडी-कोळीवाडा.

□ ***बिनधास्त* या चित्रपटातील गायक-गायिका कोण? दिग्दर्शक कोण?**

– *बिनधास्त* पुरुषपात्र विरहित चित्रपट असल्यामुळे या चित्रपटात गायकाची गाणी नव्हती. कविता कृष्णमूर्ती, हेमा सरदेसाई, बेला सुलाखे या गायिकांनी या चित्रपटातील गाणी गायली होती. चंद्रकांत कुलकर्णी या चित्रपटाचे दिग्दर्शक होते.

अनिल सुर्वे, पुणे.

□ **महेश कोठारेने भूमिका केलेला पहिला हिंदी चित्रपट कोणता?**

– *राजा और रंक.*

सोनल लहू कोळी, वरेडी.

□ **राखीने कोणकोणत्या चित्रपटात अमिताभच्या आईची भूमिका केली?**

– लावारिस, शक्ती या चित्रपटात.

चैताली चंद्रकांत कोळी, वरेडी-कोळीवाडा.

□ **मीनाक्षी शिरोडकर यांचा पहिला चित्रपट कोणता?**



– मा. विनायक यांचा *ब्रह्मचारी.*

नामदेव नारायण कोळी, वरेडी.

□ ***प्रतिघात*मध्ये वेड्याची भूमिका कोणी केली होती?**

– नाना पाटेकरने.

अशोक परशुराम परब, ठाणे (प.) .

□ **शशी कपूर व मिथुन यांनी कोणत्या चित्रपटात एकत्र भूमिका केली?**

– *कमांडो.*

श्रीनिवास सावंत, दादर.

□ **भगवान व गीताबाली या दोघांनी एकत्र भूमिका केलेले चित्रपट कोणते?**

– *अलबेला, झमेला.*

कुमुद माने, अंधेरी.

□ **प्राणला कोणकोणत्या चित्रपटात भूमिकेसाठी फिल्मफेअर ॲवॉर्ड मिळाले?**

– *उपकार, आंसू बन गये फूल, बेईमान.*

सुभद्रा गोविंद माकर, रांजणगाव गणपती.

□ **सलमान खानने कोणकोणत्या चित्रपटाच्या कथा लिहिल्या?**

– *बागी, चांद का टुकडा.*

अशोक वा. कोर्टीकर, पंढरपूर.

□ ***बहुत दिन हुए* हा चित्रपट केव्हा पडद्यावर आला होता? निर्माता-दिग्दर्शक व नायक-नायिका कोण?**

– १९५४ साली हा चित्रपट पडद्यावर आला होता. निर्माता-दिग्दर्शक एस. एस. वासन. नायकः एम. के. राधा. नायिकाः मधुबाला.

सुनील सावंत, कोल्हापूर.

□ ***मदर इंडिया* केव्हा प्रदर्शित झाला होता? या चित्रपटाला कोणकोणते पुरस्कार मिळाले?**

– *मदर इंडिया* १९५७ला पडद्यावर आला होता. या चित्रपटाला १९५७च्या सर्वश्रेष्ठ चित्रपटाचा फिल्मफेअर पुरस्कार मिळाला होता व नरगिसला सर्वश्रेष्ठ अभिनेत्रीचा पुरस्कार. कार्लोव्ही बॅरी येथील आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात या चित्रपटासाठी नरगिसला सर्वश्रेष्ठ अभिनेत्रीचा पुरस्कार मिळाला होता.

दत्तात्रय सामंत, बोरिवली.

□ **सुनिल दत्त व मधुबाला कोणकोणत्या चित्रपटात एकत्र चमकले?**

– *इन्सान जाग उठा* व *ज्वाला.*

भरत चंद्रकांत कालुवाला,
माहीम कॉजवे-मुंबई.

□ **जी. एस. कोहलीनी कोणकोणत्या चित्रपटांना संगीत दिले?**

– *लंबे हाथ, मिस्टर इंडिया, फौलाद, शिकारी, चार दरवेश, ॲडव्हेंचर्स ऑफ रॉबिनहूड ॲण्ड बँडिट, नमस्तेजी, दो मतवाले, नवजवान, संगदिल, जंग और अमन, गँग, जालसाज.*

सोनल लहू कोळी, वरेडी.

□ **अमजद खान कोणकोणत्या चित्रपटात बालकलाकार म्हणून चमकला?**

– *नया पैसा, अब दिल्ली दूर नही, माया.*

भानुदास पाशा कोळी, वरेडी.

□ **अलका कुबलचा पहिला चित्रपट कोणता?**

– *लेक चालली सासरला.* ●